## BOMBAY ACT No. XLVIII OF 1956.

## AN ACT TO PROVIDE FOR THE SALARIES AND ALLOWANCES OF THE MINISTERS OF THE GOVERNMENT OF BOMBAY AND CERTAIN OTHER MATTERS.

## सन १९५६ चा मुंबईचा अधिनियम ४८ वा.

Also see Mah Act XLI of 1975

[ राज्यपाल यांची मंजुरी मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख ३० माहे नोव्हेंबर सन १९५६ रोजीं प्रथम ( इंग्रजींत ) प्रसिद्ध केलेला. ]

### मुंबई सरकारच्या मंत्र्यांचे पगार व भत्ते आणि कित्येक इतर बाबी यांसाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई सरकारच्या मंत्र्यांचें पगार व भत्ते ठरविण्यासाठीं आणि यांत यापुढें दिलेल्या इतर कित्येक बाबींसाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी यावरून पुढें लिहिल्याप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. (१) या अधिनियमास सन १९५६ चा मुंबईचा मंत्र्यांचे पगार व भत्ते यांबाबत अधिनियम असें म्हणावें. लहान सरनामा व सुरुवात.

(२) तो तारीख १ माहे नोव्हेंबर सन १९५६ रोजीं अंमलांत आला आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

२. या अधिनियमांत, विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(अ) निवासस्थानाच्या संबंधांत "व्यवस्था" या संज्ञेंत, सरकारला किंवा कोणत्याहि स्थानिक प्राधिकाऱ्याला देणें असलेले दर व कर भरणें आणि वीज, गॅस व पाणी यांची तरतूद करणें यांचा समावेश होतो ;

(ब) "मंत्री" आणि "उपमंत्री" या संज्ञांचा अर्थ, मुंबई सरकारचा अनुक्रमें मंत्री व उपमंत्री असा समजावा आणि "मंत्री" या संज्ञेंत मुख्य मंत्र्याचा समावेश होतो ;

(क) "निवासस्थान" या संज्ञेंत, नोकरवर्गाच्या राहण्याच्या जागा आणि त्यांना लागून असलेल्या इतर इमारती व त्यांच्या बागा यांचा समावेश होतो ;

(ड) "नियम किंवा आदेश" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाअन्वयें अनुक्रमें केलेले नियम किंवा दिलेले आदेश असा समजावा.

३. प्रत्येक मंत्र्याला दरमहा रु. १,१०० पगार देण्यांत येईल. मंत्र्यांचे पगार.

४. (१) प्रत्येक मंत्र्यास, भाडें न आकारतां त्याच्या हुद्याच्या सबंध मुदतींत आणि त्यानंतर लगतच्या पंधरा दिवसांच्या मुदतींत मुंबई येथें फर्निचर व इतर सुखसोयींनीं सुसज्ज असलेलें निवासस्थान वापरण्याचा किंवा अशा निवासस्थानाऐवजीं दरमहा रु. २५० या दरानें घरभत्ता मिळण्याचा हक्क असेल. मंत्र्यांची निवासस्थानें.

(२) या कलमाअन्वयें तरतूद करण्यांत आलेल्या कोणत्याहि निवासस्थानाच्या व्यवस्थेच्या संबंधांत खुद्द मंत्र्यावर कोणताहि आकार पडतां कामा नये.

(३) या कलमाअन्वयें तरतूद करण्यांत आलेलीं निवासस्थानें फर्निचर वगैरेंनीं सुसज्जित करण्याचा खर्च, राज्य सरकार नियम करून किंवा आदेश देऊन ठरवील अशा प्रमाणांत असेल.

मंत्र्यांचीं वाहनें.

५. (१) मंत्र्यांच्या उपयोगाकरितां मोटार गाड्या व इतर योग्य वाहनें, तीं सुस्थितीत ठेवणें व दुरुस्त करणें यांच्या संबंधांत याबाबत नियम करून किंवा आदेश देऊन ठरविण्यांत येतील अशा शर्तींवर, वेळोवेळीं खरेदी करण्याचा व पुरविण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे.

(२) त्याचप्रमाणें प्रत्येक मंत्र्यास दरमहा रु. २५० या दरानें वाहनभत्ता देण्यांत येईल.

उपमंत्र्यांचे पगार.

६. प्रत्येक उपमंत्र्यास दरमहा रु. ७५० पगार देण्यांत येईल.

उपमंत्र्यांचीं निवासस्थानें.

७. (१) प्रत्येक उपमंत्र्यास, भाडें न आकारतां त्याच्या हुद्याच्या सबंध मुदतींत आणि त्यानंतर लगतच्या पंधरा दिवसांच्या मुदतींत मुंबई येथें फर्निचर व इतर सुखसोयींनीं सुसज्ज असलेलें निवासस्थान वापरण्याचा किंवा अशा निवासस्थानाऐवजीं दरमहा रु. १५० या दरानें घरभत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(२) या कलमाअन्वयें तरतूद करण्यांत आलेल्या कोणत्याहि निवासस्थानाच्या व्यवस्था खर्चाच्या संबंधांत खुद्द उपमंत्र्यावर कोणताहि आकार पडतां कामा नये.

(३) या कलमाअन्वयें तरतूद करण्यांत आलेलीं निवासस्थानें फर्निचर वगैरेंनीं सुसज्जित करण्याचा खर्च, राज्य सरकार, नियम करून किंवा आदेश देऊन ठरवील अशा प्रमाणांत असेल.

उपमंत्र्यांचा वाहनभत्ता.

८. प्रत्येक उपमंत्र्यास दरमहा २०० रुपये या दरानें वाहनभत्ता देण्यांत येईल.

प्रवास भत्ते व दैनिक भत्ते आणि मुख्य ठाण्यांखेरीज इतर ठिकाणीं राहण्यासाठीं जागा यांबाबत.

९. मंत्री व उपमंत्री यांना, ते सार्वजनिक कामासाठीं दौऱ्यावर असतांना राज्य सरकारनें केलेल्या नियमांवरून व दिलेल्या आदेशांवरून ठरविण्यांत येईल अशा दरांनीं व शर्तींवर प्रवासभत्ते व दैनिक भत्ते मिळण्याचा आणि त्यांनीं अशा कामासाठीं भेट दिलेल्या ठिकाणीं राहाण्यासाठीं योग्य जागा मिळण्याचा हक्क असेल.

वैद्यकीय मदत.

१०. राज्य सरकारनें केलेल्या नियमांस अथवा दिलेल्या आदेशांस पात्र राहून, मंत्री व उपमंत्री आणि प्रसंगाप्रमाणें मंत्र्याच्या किंवा उपमंत्र्याच्या बरोबर राहणारे व त्याच्यावर अवलंबून असणारे त्याच्या कुटुंबांतील इसम ह्यांना राज्य सरकारनें चालविलेल्या रुग्णालयांत मोफत जागा मिळण्याचा व वैद्यकीय मदत व उपचार मोफत मिळण्याचा हक्क असेल.

खुलासा.—ह्या कलमाच्या कारणांकरितां "कुटुंबांतील इसम" या संज्ञेचा अर्थ पति, पत्नी, मुलगा, मुलगी, बाप, आई, भाऊ किंवा बहीण असा समजावा.

MAH ACT 41 of 75

११. अतिथ्यभत्ता म्हणून दरसाल रु. १५,००० मुख्य मंत्र्याच्या लाभांत देण्यांत येतील.

मुख्य मंत्र्यास अतिथ्यभत्ता.

१२. राज्य विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते ठरविणाऱ्या त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यांत कोणताहि मजकूर असला तथापि, मंत्र्यास किंवा उपमंत्र्यास, तो मुंबई विधानसभेचा किंवा मुंबई विधानपरिषदेचा सदस्य असला तरी, अशा कायद्याअन्वयें कोणताहि पगार किंवा भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाहीं.

मंत्री व उपमंत्री यांस राज्य विधान-मंडळाचे सदस्य म्हणून पगार व भत्ते मिळण्याचा हक्क नसणें.

१३. शंका टाळण्यासाठीं यावरून असें जाहीर करण्यांत येत आहे कीं, एखादा इसम, तो उपमंत्री म्हणून हुद्दा धारण करीत आहे याच केवळ कारणावरून मुंबई विधानसभेचा किंवा मुंबई विधानपरिषदेचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा सदस्य असण्यास अपात्र ठरविण्यांत येतां कामा नये.

उपमंत्री अपात्र ठरणार नाहींत.

१४. (१) राज्य सरकारास या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरितां नियम करण्याचा किंवा आदेश देण्याचा अधिकार आहे.

(२) या कलमाअन्वयें केलेला कोणताहि नियम किंवा दिलेला कोणताहि आदेश, तो १ माहे नोव्हेंबर सन १९५६ या तारखेच्या पूर्वीची नाहीं अशा कोणत्याहि तारखेस गतकालापेक्षी अंमलांत येईल अशा रीतीनें करण्याचा अधिकार आहे.

(३) या कलमाअन्वयें केलेले नियम किंवा दिलेले आदेश ते जणूं या अधिनियमांत करण्यांत किंवा देण्यांत आल्याप्रमाणें अंमलांत येतील.

नियम करण्याचा व आदेश देण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

१५. सन १९५२ चा मुंबईचा मंत्र्यांचे पगार व भत्ते याबाबत अधिनियम (ज्यास या कलमांत "सदरहू अधिनियम" असें म्हटलें आहे) आणि जे प्रदेश तारीख १ माहे नोव्हेंबर सन १९५६ नंतर नवीन मुंबई राज्याचे भाग बनतात त्या प्रदेशांत किंवा त्यांच्या संबंधांत त्या तारखेच्या लगतपूर्वी अंमलांत असलेला, ह्या अधिनियमाच्या ठरावांसारखा कोणताहि कायदा हे रद्द होतील :

रद्द करणें.

मात्र असें ठरविण्यांत येते कीं, अशा रीतीनें सदरहू अधिनियम व कायदा रद्द करण्यांत आला असला तरीहि, सदरहु अधिनियमाअन्वयें केलेले कोणतेहि नियम किंवा दिलेले कोणतेहि आदेश, ते या अधिनियमाच्या ठरावांशीं विसंगत नसतील तेथवर अंमलांत असण्याचे चालू राहतील आणि ते या अधिनियमाअन्वयें केलेले नियम किंवा दिलेले आदेश यांवरून रद्द करण्यांत आले असतील तो प्रसंग खेरीजकरून व रद्द करण्यांत येईपर्यंत या अधिनियमाच्या ठरावांअन्वयें करण्यांत आले आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे.

(True translation)
D. T. MUZUMDAR,
Examiner of Books and Publications, Bombay.